**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी व वेतन संरचना मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.इएसटी-२००९/प्र.क्र.१५६/ पापु २३**
**मंत्रालय मुंबई ३२, दिनांक:- २७ ऑगस्ट,२००९**

**वाचा - शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९,दि.२२.४.२००९**

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणीच्या धर्तीवर राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी,२००६ पासून वेतनश्रेणी सुधारीत करण्यात आली आहे. त्यानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांची वेतनश्रेणी व वेतन संरचना त्यानुसार सुधारीत करणे आवश्यक होते. यास्तव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मंजुर केलेल्या वेतनश्रेणीचा अभ्यास करुन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणी व वेतन संरचना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविला होता. त्यानुसार या प्रस्तावाला मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम ६६ (२) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अधिकारी व कर्मचारी यांना दि. १ जानेवारी,२००६ पासून शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि.२२.४.२००९ मध्ये नमूद केलेल्या सर्व तरतूदीच्या अधीन राहून तसेच यापोटी होणारा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आपल्या उत्पन्नातून करेल व शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण राज्य शासनाकडून आस्थापनेपोटी कोणत्याही तरतुदीची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या मागणी करणार नाही या अटींवर सुधारीत वेतनश्रेणी / वेतन संरचना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक १ जानेवारी,२००६ पासून लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या पोटी होणारा खर्च भागविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुढीलप्रमाणे उत्पन्नवाढीच्या उपाययोजना आखेल व प्राधिकरण पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत राहण्यासाठी अंतर्गत सुधारणा करेल:-

एक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा योजनांचा पूर्णत: आढावा घेण्यात येईल व या योजना पूर्ण कार्यक्षमतेने चालविण्याची व्यवस्था करेल. तसेच ज्या योजनेसाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता

भासेल तेथे अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती करण्यात येईल, कोणतीही नवीन नियुक्ती करण्यात येणार नाही. मजीप्राच्या आस्थापनेकडे असलेल्या सर्व कार्यालयांचा आढावा घेऊन ज्याठिकाणी पुरेसा कार्यभार नाही अशी कार्यालये बंद करण्यात यावीत.

दोन) ज्या प्रादेशिक विभागांकडे कमी जास्त अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत आणि ज्या कार्यालयांकडे पदे रिक्त आहेत ती पदे ज्या प्रादेशिक विभागांकडे अतिरिक्त कर्मचारी आहे, त्यामधून बदलीने भरण्यात येतील.

तीन) ग्रामीण/नागरी विभागातील नवीन नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पूर्णठेव तत्वावर योजना पूर्ण झाल्यानंतर पाणीपट्टी वसुलीसह चालविण्यास घेईल. जे कर्मचारी अतिरिक्त होतील त्यांच्या सेवा या योजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील.

चार) ग्रामीण / नागरी विभागात विविध कार्यक्रमातंर्गत पूर्ण झालेल्या / होत असलेल्या योजना एजंसी तत्वावर देखभाल दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे घेण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकडे संपर्क साधून प्रयत्न करेल व अशा योजना अतिरिक्त कर्मचाऱ्यांमार्फत चालवेल व आपल्या उत्पन्नामध्ये वाढ करेल.

पाच) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अतिरिक्त अधिकारी/कर्मचारी जिल्हा परिषद /भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा वा शासनाच्या इतर विभागात प्रतिनियुक्तीवर/कायमस्वरुपी पाठविण्याचा निर्णय झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

सहा) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे स्थानिक स्वराज्य संस्था व इतर थकबाकीदार यांचेकडून येणे असलेली वसुली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या तरतुदीनुसार प्रभावीपणे करेल.

सात) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जेथे मालमत्ता आहे तेथे, त्यांचा पुनर्विकास करण्याचे काम हाती घेण्यात येईल.

आठ) मजीप्राच्या सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या दर्जानुसार क्षेत्रीय,तांत्रिक व कार्यालयीन कामकाजाबाबतचे प्रशिक्षण देऊन कार्यालयीन कामकाजाचा दर्जा वाढविणे, तसेच प्रत्येकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबत दृढसंकल्प व बांधीलकी याबाबत कर्मचाऱ्यांकडून हमी घेण्यात येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वर नमूर केल्याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचे पुनर्वाटप (Redeployment) व उत्पन्नवाढीकरीता उपाययोजनांचा ठोस कृती आराखडा एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिक रणाच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्याकरीता व आवश्यकतेनुसार पुनर्वाटप आराखड्यानुसार काम करण्याकरीता सर्व अधिकारी /कर्मचारी यांचेकडून हमीपत्र घेणे बंधनकारक राहील.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्राथमिक वेतन निश्चितीचे नियम संदर्भात दर्शविलेल्या वित्त विभागाच्या दिनांक २२.४.२००९ रोजीच्या अधिसूचने अन्वये व त्यास जोडलेल्या अनुसुचित दर्शविल्याप्रमाणे राहतील. या अधिसुचनेतील वेतन निश्चितीचे नियम व तद्नुषंगाने शासनाने वेळोवेळी काढलेले आदेश लक्षात घेवून शासन या निर्णयाद्वारे प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी २००६ पासून लागू करीत आहेत.

४. या आदेशानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत विकल्प दयावयाचे आहेत. एकदा दिलेला विकल्प हा अंतिम स्वरुपाचा राहील.

५. या आदेशानुसार दि. १ जानेवारी, २००६ ते ३१ मार्च,२००९ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी वेतनाची थकबाकी मिळण्यास पात्र असल्यास, सदर रक्कम पुढील ५ वर्षात समान हप्त्यात संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा करण्यात यावी.

६. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१७८/०९/साऊ, दिनांक २०.०८.२००९ नुसार त्या विभागाच्या संमती व सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२००९०८२६१८५४४६००१** असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(जयलक्ष्मी चेक्कला)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :**

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय-३, सेवा-१), मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सिडको भवन,नवी मुंबई.
मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व).
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
वित्त विभाग (कार्यासन साऊ).
निवडनस्ती पापु-२३

**शासन निर्णय क्रमांक इएसटी-२००९/प्र.क्र.१५६/पापु-२३, दि. २७ ऑगस्ट,२००९ चे जोडपत्र**

**परिशिष्ट"अ"**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| १ | सदस्य सचिव (प्रशासन) | १८४००-२२४०० | ३७४००-६७००० | १००००/- |
| २ | सदस्य सचिव (तांत्रिक) | १८४००-२२४०० | ३७४००-६७००० | १००००/- |
| ३ | विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता | १६४००-२०९०० विशेष वेतन रु. ८००/- | ३७४००-६७००० | ८९००/- |
| ४ | मुख्य अभियंता | १६४००-२०९०० | ३७४००-६७००० | ८९००/- |
| ५ | वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी | १६४००-२०००० | ३७४००-६७००० | ८९००/- |
| ६ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, उप सचिव, सह सचिव | १२०००-१६५००<br>१४३००-१८३०० | १५६००-३९१००<br>३७४००-६७०० | ७६००/-<br>८७००/- |
| ७ | उप मुख्य लेखाधिकारी | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६००/- |
| ८ | अधीक्षक अभियंता | १२०००-१६५००<br>१४३००-१८३००<br>२०% पदासाठी निवडश्रेणी | १५६००-३९१००<br>३७४००-६७००० | ७६००/-<br>८७००/- |
| ९ | लेखाधिकारी/(आ.अ)द | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६००/- |
| १० | जनसंपर्क अधिकारी | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६००/- |
| ११ | कार्यकारी अभियंता (केंद्रिय कार्यालय) | १०६५०-१५८५० (विशेष वेत्न ६००/-) | १५६००-३९१०० | ६६००/- |
| १२ | कार्यकारी अभियंता (स्था.) | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६००/- |
| १३ | कार्यकारी अभियंता (यां.) | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६००/- |
| १४ | संशोधन अधिकारी | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६००/- |
| १५ | प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी | ८०००-१३५०० | ९३००-३४८०० | ५४००/- |
| १६ | वरिष्ठलेखा अधिकारी | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४००/- |
| १७ | अंतर्गत लेखा परिक्षा अधिकारी | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४००/- |
| १८ | कायदा व कामगार अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६००/- |
| १९ | सहाय्यक सचिव | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६००/- |
| २० | कॉम्प्युटर प्रोग्रामर | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४००/- |

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| २१ | सहाय्यक कार्यकारी अभियंता | ८०००-१३५०० (८५५०) **Higher start** उच्च श्रेणी | १५६००-३९१०० | ५४००/- |
| २२ | कक्ष अधिकारी/ तहसिलदार | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| २३ | लेखा अधिकारी (लेखा परिक्षा अधिकारी ) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| २४ | लेखाधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| २५ | लेखाधिकारी (परिव्यय लेखापाल) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| २६ | उप अभियंता ( मध्यवर्ती कार्यालय) | ८०००-१३५०० विशेष वेतन ३२० | १५६००-३९१०० | ५४००/- |
| २७ | उप अभियंता/सहा अभियंता श्रेणी-१ उप कार्य. अभियंता सहा. संशोधन अधिकारी उप विभागीय अधि. (स्थापत्य/यांत्रिकी) | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४००/- |
| २८ | रसायन शास्त्रज्ञ | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| २९ | स्वीय सहाय्यक (लघुलेखक) | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६००/- |
| ३० | उच्चश्रेणी लघुलेखक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| ३१ | सहाय्यक अभियंता श्रेणी-२/शाखा अभियंता | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| ३२ | लेखापाल/परिक्षक/ सांख्यिकी सहाय्यक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ३३ | विशेष अधीक्षक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| ३४ | अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ३५ | कर्मचारी अधिकारी | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ३६ | स्थानिक अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ३७ | भांडार अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ३८ | प्रमुख आरेखक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ३९ | सहा लेखाधिकारी (मुख्य लेखापाल) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ४० | कनिष्ठअभियंता | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| | (स्था./यां./विद्युत) | | | |
| ४१ | कार्य निरिक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८००/- |
| ४२ | वीज पर्यवेक्षक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२००/- |
| ४३ | प्रथम लिपिक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२००/- |
| ४४ | लघुलेखक निम्नश्रेणी | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ४५ | उपलेखापाल | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२००/- |
| ४६ | उभारणीकार | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२००/- |
| ४७ | सहाय्यक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३००/- |
| ४८ | गाळणी निरिक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८००/- |
| ४९ | आरेखक | १)४५००-७०००<br>२) ५०००-८००० | ५२००-२०२००<br>९३००-३४८०० | २८००/-<br>४२००/- |
| ५० | भांडारपाल | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८००/- |
| ५१ | पाणी पुरवठा केंद्र पर्यवेक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८००/- |
| ५२ | रोखपाल | ४०००-६००० (रोख रक्कम हाताळण्याबाबत अधिक विशेष वेतन) | ५२००-२०२०० | २४००/- |
| ५३ | वरिष्ठलिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ५४ | सांख्यिकी सहाय्यक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ५५ | पाणी पट्टी अधीक्षक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ५६ | स्वयंचल यांत्रिकी | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ५७ | सहाय्यक आरेखक | १) ४०००-६०००<br>२)४५००-५००० | ५२००-२०२००<br>५२००-२०२०० | २४००/-<br>२८००/- |
| ५८ | निरीक्षक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ५९ | सर्वेक्षक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ६० | उप अवेक्षक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ६१ | वीजतंत्री | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ६२ | पाळी अभियंता | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ६३ | प्रमुख मीटर दुरुस्तीकार | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |
| ६४ | समय लेखक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ६५ | निवडश्रेणी लिपिक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ६६ | टंकलेखक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ६७ | क्लोरोनेटर | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ६८ | सहाय्यक गाळणी | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| | निरिक्षक | | | |
| ६९ | विद्युत चालक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ७० | प्रमुख तारतंत्री | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ७१ | अनुरेखक<br>७ वर्षानंतर | ३२००-४९००<br>४०००-६००० | ५२००-२०२००<br>५२००-२०२०० | २०००/-<br>२४००/- |
| ७२ | गाळणी परिचर | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ७३ | संगणक/यंत्रगणक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ७४ | कनिष्ठलिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ७५ | लिपिक नि टंकलेखक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ७६ | सहाय्यक भांडारपाल | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ७७ | भांडार लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ७८ | उत्सर्ग पर्यवेक्षक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ७९ | तांत्रिक सहाय्यक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ८० | प्रयोगशाळा सहाय्यक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ८१ | कारकून/केमिकल कारकून | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ८२ | यांत्रिकी | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ८३ | पाणीपट्टी वसुलीकार | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ८४ | मीटर वाचक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ८५ | मिस्त्री | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ८६ | हजेरी लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ८७ | खातेवही लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ८८ | सहाय्यक भांडार लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ८९ | जड वाहन चालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९० | पंप परिचर | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९१ | इम्प्रोव्हेर | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९२ | गाळणी चालक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |
| ९३ | टंकलेखक | ३०५०-४५९० अधीक विशेष वेतन रु.८०/- | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९४ | पत्ता यंत्र चालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९५ | वाहन चालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९६ | दूरध्वनी परिचर | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९७ | रसायनी | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९८ | इंजिन चालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ९९ | रस्ता रुळ चालक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २०००/- |

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| १०० | पंपचालक (पंप ड्रायव्हर) | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०१ | पंप चालक (पंप ऑपरेटर) | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०२ | जोडारी | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०३ | मीटर दुरुस्तीकार | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०४ | समयपाल | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०५ | मीटर परिक्षक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०६ | सहा.निरिक्षक (मीटर) | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०७ | लोहार | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०८ | गवंडी | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १०९ | कातारी | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ११० | रंगारी | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| १११ | सुतार | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ११२ | संघाती | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ११३ | तारतंत्री | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ११४ | लाईन मन | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ११५ | आवेदक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ११६ | मिस्त्री (श्रेणी-२) | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९००/- |
| ११७ | मोहरील | २७५०-४४०० | ५२००-२०२०० | १८००/- |
| ११८ | बांधणीकार | २७५०-४४०० | ५२००-२०२०० | १८००/- |
| ११९ | मदतनीस | २७५०-४४०० | ५२००-२०२०० | १८००/- |
| १२० | माळी | २७५०-४४०० | ५२००-२०२०० | १८००/- |
| १२१ | पंपचालक | २७५०-४४०० | ५२००-२०२०० | १८००/- |
| १२२ | तेलवाला/आगवाला | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १६००/- |
| १२३ | मुकादम | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १६००/- |
| १२४ | पंपचालक "ब" श्रेणी | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १६००/- |
| १२५ | दप्तरी | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १६००/- |
| १२६ | नाईक | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १६००/- |
| १२७ | लोहमुद्रक नि चक्रमुद्रक यंत्रचालक | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १६००/- |
| १२८ | शिपाई | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १२९ | चौकीदार | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३० | पहारेकरी | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३१ | हमाल | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३२ | भांडारपाल परिचर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३३ | भांडार चौकीदार | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३४ | मदतनीस | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| १३५ | परिचर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३६ | मजूर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३७ | झाडपवाला | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३८ | चावीवाला | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १३९ | माळी | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४० | सफाईकार | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४१ | स्वच्छक | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४२ | पाणी नमुना वाहक | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४३ | टपाली | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४४ | वंगणकार | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४५ | गाळणीवाला | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४६ | पंप परिचर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४७ | गाळणी परिचर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४८ | टाकी परिचर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १४९ | मुकादम | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५० | खलाशी | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५१ | नळवाला (पाणी वाला) | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५२ | क्लोरीन परिचर (प्रयोगशाळा) | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५३ | लाईनमन (सहाय्यक) | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५४ | तारतंत्री (सहाय्यक) | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५५ | नळकरी (कारागीर) | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५६ | मिटर परिचर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३००/- |
| १५७ | सहाय्यक जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४००/- |
| १५८ | विभागीय लेखापाल | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२००/- |
| १५९ | स्थापत्य अभि.सहा. | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४००/- |

टिप :- १) अ.क्र. १२९, १३४, १३६, १३९, १४०, १४१, १४९, १५१, १५३ वरील पदांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे परिपत्रक क्रमांक इएसटी-२००६/सी.आर.२२/आस्थापना-७,दि. २९.५.२००६ अन्वये जलसेवक असे संबोधण्यात येते.

२) दि.१/१/१९९६ पासून महार७ाष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील ज्या पदांना विशेष वेतन लागू करण्यात आले होते. अशा पदांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक, विवेसु- १२९८/प्र.क्र.१५/सेवा.१० दिनांक १७/४/२००० अन्वये दि.१/८/२००० पासून विशेष वेतन बंद

केल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील आस्थापनेवरील पदांनाही विशेष वेतन बंद करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निवृत्ती वेतन धारकांना सहाव्या वेतन आयोगानुसार निवृत्ती वेतन/निवृत्ती/मृत्यू उपदान आणि कुटुंब निवृत्ती वेतन मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.इएसटी-२००९/प्र.क्र.१५६(१)/ पापु -२३**
**मंत्रालय मुंबई ३२, दिनांक:- २७ ऑगस्ट,२००९**

**वाचा : १) शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि.२२.४.२००९.**
**२) शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग सेनिवे-१००९/प्र.क्र.२९/सेवा-४ दि.५ मे, २००९.**
**३) शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग सेनिवे-१००९/३१/सेवा-४ दि.५ मे, २००९.**
**४) शासन निर्णय क्र. वित्त विभाग सेनिवे-१००९/प्र.क्र.३३/सेवा-४ दि.२२जून, २००९.**
**५) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.इएसटी-२००९/प्र.क्र.१५६ /पापु-२३, दि.२७ऑगस्ट-२००९.**

**प्रस्तावना :**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १.१.२००६ पासून सुधारित वेतनश्रेणी / वेतन संरचना संदर्भ क्रमांक ५ अन्वये लागू करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे राज्य शासकीय निवृत्ती वेतन धारकांना निवृत्ती वेतन/निवृत्ती/मृत्यू उपदान आणि कुटुंब निवृत्ती वेतनाबाबत सुधारीत केलेल्या तरतुदी वर नमूद केलेल्या संदर्भ क्रमांक २, ३ आणि ४ नुसार लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील निवृत्ती वेतन धारकांना सुधारीत निवृत्ती वेतन/निवृत्ती/ मृत्यु उपदान आणि कुटुंब निवृत्ती वेतन लागू करणे आवश्यक होते. यास्तव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या सुधारीत तरतुदीचा अभ्यास करुन प्राधिकरणातील निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्ती वेतनात/निवृत्ती उपदान आणि कुटुंब निवृत्ती वेतनात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविला होता. त्यानुसार या प्रस्तावाला मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

या शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम ६६ (२) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील निवृत्ती वेतन धारकांना (१)शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग सेनिवे-१००९/प्र.क्र.-२९/सेवा-४, दि.५ मे, २००९, (२) शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग सेनिवे-१००९/३१/सेवा-४, दि.५ मे, २००९ (३) शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग सेनिवे-१००९/प्र.क्र.३३/सेवा-४, दि.२२ जून, २००९ मध्ये नमूद केलेल्या सर्व तरतुदींच्या अधिन राहून तसेच यापोटी होणारा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आपल्या उत्पन्नातून करेल व शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण राज्य शासनाकडून आस्थापनेपोटी कोणत्याही  तरतुदीची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या मागणी करणार नाही या अटींवर सुधारीत निवृत्ती वेतन / निवृत्ती/मृत्यु उपदान आणि कुटुंब निवृत्ती वेतन लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२.	या पोटी होणारा खर्च भागविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुढीलप्रमाणे उत्पन्नवाढीच्या उपाययोजना आखेल व प्राधिकरण पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत राहण्यासाठी अंतर्गत सुधारणा करेल:-

एक)	महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा योजनांचा पूर्णत: आढावा घेण्यात येईल व या योजना पूर्ण कार्यक्षमतेने चालविण्याची व्यवस्था करेल. तसेच ज्या योजनेसाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासेल तेथे अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती करण्यात येईल, कोणतीही नवीन नियुक्ती करण्यात येणार नाही.  मजीप्राच्या आस्थापनेकडे असलेल्या सर्व कार्यालयांचा आढावा घेऊन ज्याठिकाणी पुरेसा कार्यभार नाही अशी कार्यालये बंद करण्यात यावीत.

दोन)	ज्या प्रादेशिक विभागांकडे कमी जास्त अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत आणि ज्या कार्यालयांकडे पदे रिक्त आहेत ती पदे ज्या प्रादेशिक विभागांकडे अतिरिक्त कर्मचारी आहे, त्यामधून बदलीने भरण्यात येतील.

तीन)	ग्रामीण/नागरी विभागातील नवीन नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पूर्णठेव तत्वावर योजना पूर्ण झाल्यानंतर पाणीपट्टी वसुलीसह चालविण्यास घेईल.  जे कर्मचारी अतिरिक्त होतील त्यांच्या सेवा या योजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील.

चार)	ग्रामीण / नागरी विभागात विविध कार्यक्रमातंर्गत पूर्ण झालेल्या / होत असलेल्या योजना एजंसी तत्वावर  देखभाल दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे घेण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकडे संपर्क साधून प्रयत्न करेल व अशा योजना अतिरिक्त कर्मचाऱ्यांमार्फत चालवेल व आपल्या उत्पन्नामध्ये वाढ करेल.

पाच)	महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अतिरिक्त अधिकारी/कर्मचारी जिल्हा परिषद /भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा वा शासनाच्या इतर विभागात प्रतिनियुक्तीवर/कायमस्वरुपी पाठविण्याचा निर्णय झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

सहा)	महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे स्थानिक स्वराज्य संस्था  व इतर थकबाकीदार यांचेकडून येणे असलेली वसुली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या तरतुदीनुसार प्रभावीपणे करेल.

सात) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जेथे मालमत्ता आहे तेथे, त्यांचा पुनर्विकास करण्याचे काम हाती घेण्यात येईल.

आठ) मजीप्राच्या सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या दर्जानुसार क्षेत्रीय,तांत्रिक व कार्यालयीन कामकाजाबाबतचे प्रशिक्षण देऊन कार्यालयीन कामकाजाचा दर्जा वाढविणे, तसेच प्रत्येकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबत दृढसंकल्प व बांधीलकी याबाबत कर्मचाऱ्यांकडून हमी घेण्यात येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वर नमूर केल्याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचे पुनर्वाटप (Redeployment) व उत्पन्नवाढीकरीता उपाययोजनांचा ठोस कृती अराखडा एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिक रणाच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्याकरीता व आवश्यकतेनुसार पुनर्वाटप आराखड्यानुसार काम करण्याकरीता सर्व अधिकारी /कर्मचारी यांचेकडून हमीपत्र घेणे बंधनकारक राहील.

३. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १७८/२००९/साऊ, दिनांक २०.८.२००९ नुसार त्या विभागाच्या संमती व सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०८२७१४५५२४००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(जयलक्ष्मी चेक्कला)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :**

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय-३, सेवा-१), मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सिडको भवन,नवी मुंबई.
मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व).
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
वित्त विभाग (कार्यासन साऊ).
निवडनस्ती पापु-२३